महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
४था मजला, प्रकाशगड, स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१
Tel.: 2642 2211 / 2647 2131 Tlx.: 011-78293 / 94 MSEB IN Fax : 022-26476749 Gram : MUMBAIGRID Mumbai

**साप्रवि/वेतन व देयके/सण अग्रिम/११९/** No 26067 **दिनांक :** 25 AUG 2011

# परिपत्रक

**विषय :-** महत्वाच्या सणासाठी अग्रिम देण्याबाबत.

सामान्य आदेश क्र.२६७ दि. १२.१०.१९५७ अन्वये म.रा.वि.वि.कंपनीतील कर्मचाऱ्यांना शासकीय नियमानुर महत्वाच्या सणासाठी अग्रिम देण्यात येते.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र. अग्रिम-२०१०/प्र.क्र.१२/१०/विनियम दि. १० मे २०१० अन्वये सण अग्रिमासाठी मुळ वेतनाची मर्यादा सुधारीत करण्यात आली आहे.

प्रशासकीय परिपत्रक क्र. १ दि. २९.०९.०५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व्यवस्थापकीय संचालक (वितरण) यंनी संचालक (संचालन), संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करून महावितरण कंपनीतील ज्या कर्मचाऱ्यांचे मुळ वेतन रु. १४०७५/- (रुपये चौदा हजार पंच्याहत्तर फक्त) पेक्षा जास्त नसेल अशा कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय सण अग्रिम रु. २५००/- देण्यास मान्यता दिली आहे.

सण अग्रिम फक्त पुढील सणांना तसेच शासनाकडून वेळोवेळी घोषित करण्यात येणाऱ्या सणांसाठी अनुज्ञेय राहील.

१) दिवाळी
२) रमझान इद
३) ख्रिसमस
४) पारशी नववर्ष
५) संवत्सरी
६) रोश-होशना
७) वैशाखी पौर्णिमा (भगवान बुध्द जयंती)
८) स्वातंत्र्य दिन
९) प्रजासत्ताक दिन

सदरहू परिपत्रक निर्गमित झालेल्या दिनांकापसुन आमलात येईल.

सण अग्रिम मंजूर करण्या संबंधिच्या इतर अटि व शर्ति पूर्वी विहित केल्याप्रमाणे रहातील.

महाव्यवस्थापक (क-आस्था)

**प्रति,**
महावितरण कंपनीतील प्रेषण यादीप्रमाणे.

PC III/Desktop/Marathi letter